महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६९ वे | दिनांक : ०१/०३/२०२६ | वार : रविवार

## धनंजय मुंडेंच्या केसाला धक्का लागला तर कार्यक्रम खल्लास : गोविंद फड यांची मनोज जरांगेंना थेट धमकी





**परळी :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील आणि परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यातील वाद आता विकोपाला गेल्याचे पाहायला मिळत आहे. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आणि परळी बाजार समितीचे माजी सभापती गोविंद फड यांनी सोशल मीडियावर एक खळबळजनक पोस्ट शेअर करत मनोज जरांगे पाटील यांना थेट धमकी दिली आहे. "धनंजय मुंडे यांच्या केसाला पण धक्का लागला, तर कार्यक्रम खल्लास... जरांगे, सुरेश धस भंडारा लावून बोलतोय," अशा आशयाची ही पोस्ट सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून मनोज जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे यांच्यात सातत्याने शाब्दिक युद्ध सुरू आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर हा वाद सुरू झाला. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असून तो सध्या तुरुंगात आहे. या घटनेवरून जरांगे पाटील यांनी मुंडेंवर गंभीर आरोप करत सडकून टीका केली होती.

काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आपल्याला मारण्याचा कट रचला जात असल्याचा खळबळजनक दावा केला होता. या प्रकरणात अमोल खुणे नावाच्या तरुणाला संशयित म्हणून अटक करण्यात आली होती, जो सध्या जामिनावर बाहेर आहे. या कटामागेही राजकीय हात असल्याचा संशय जरांगे यांनी व्यक्त केला होता, ज्यामुळे परळी आणि आसपासच्या परिसरात तणाव वाढला होता.

गोविंद फड यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्यासह आमदार सुरेश धस यांचाही उल्लेख केल्याचे समजते. 'धनंजय मुंडे यांच्या केसाला पण धक्का लागला तर कार्यक्रम खल्लास.. जरांगे, सुरेश धस भंडारा लावून बोलतोय' असा मजकूर या पोस्टमध्ये आहे. "भंडारा लावून बोलतोय" या शब्दांतून त्यांनी दिलेली ही चेतावणी थेट संघर्षाला आमंत्रण देणारी असल्याचे बोलले जात आहे. या संदर्भात अद्याप गोविंद फड किंवा धनंजय मुंडे यांच्याकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, मात्र सोशल मीडियावर या पोस्टमुळे आता वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## घुसखोरांविरुद्ध राज्य सरकारची 'झिरो टॉलरन्स' मोहीम



**मुंबई :** विधान परिषदेमध्ये लक्षवेधी सूचना (कामकाज क्र. ४) अंतर्गत मा. प्रवीण दरेकर यांनी मुंबईतील व्यावसायिक अवैध बांगलादेशी घुसखोरीच्या वाढत्या प्रश्नाबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केले की, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या विषयावर शून्यसहिष्णुतेची भूमिका घेत आक्रमक कारवाई सुरू केली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात इंटेलिजन्स आधारित संयुक्त मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक पोलीस ठाण्यात पाच कर्मचाऱ्यांची विशेष टीम नियुक्त करण्यात आली आहे. एटीएस आणि स्थानिक पोलीस यांच्या समन्वयातून नियमित तपासणी व छापेमारी सुरू आहे.

मागील पाच वर्षांतील आकडेवारी सादर करताना त्यांनी सांगितले की, २०२१ मध्ये १०९, २०२२ मध्ये ७७, २०२३ मध्ये १२७, २०२४ मध्ये २०२ आणि २०२५ मध्ये तब्बल २३७६ अवैध बांगलादेशींना हद्दपार करण्यात आले आहे. एका वर्षात दोन हजारांहून अधिक जणांना हद्दपार करून महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली असल्याचे त्यांनी नमूद केले. केंद्र शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार पुरावे निश्चित झाल्यास गुन्हा दाखल न करताही संबंधितांना थेट बीएसएफच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे कारवाईला अधिक वेग आला आहे.

राज्यात प्रथमच डिटेन्शन सेंटर उभारण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कन्स्ट्रक्शन साईट्सवरील कामगारांची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई केली जात आहे. तसेच महानगरपालिका व पोलीस विभाग संयुक्त कारवाईद्वारे फेरीवाल्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करत आहेत.

अवैध घुसखोरी रोखण्यासाठी नागरिकांनी संशयास्पद हालचालींबाबत पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले. राज्याच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदमांनी ठामपणे सांगितले.

उत्तर देत असताना राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की आवश्यक तिथे कोंबिंग ऑपरेशन आणि आवश्यक असल्यास स्पेशल टास्क फोर्सची निर्मिती करण्यात येईल.

## अब्रू असलेल्यांनी दाव्याच्या गप्पा माराव्यात : भुमरेंच्या नोटीसला मी फुकट भीकही घालत नाही- अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी संदीपान भुमरे आणि त्यांच्या समर्थकांवर अत्यंत गंभीर आरोप करत थेट आव्हान दिले आहे. ज्याला अब्रू असते, तो अब्रू नुकसानीचा दावा करतो; मी अशा दाव्यांना फुकटची भीकही घालत नाही, अशा शब्दांत त्यांनी भुमरेंनी दिलेल्या नोटीसीवर प्रतिक्रिया दिली आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, समृद्धी महामार्गाचे ११५० कोटी रुपये ढापण्याचा प्रयत्न झाला आहे. एक साधा ड्रायव्हर एवढी हिंमत करूच शकत नाही. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, १९८५ मध्ये जन्मलेल्या व्यक्तीचा १९७१ चा हिबानामा कसा असू शकतो? तसेच, एखादे हिंदू कुटुंब मुस्लिमाला हिबानामा (भेटपत्र) कसे करून देऊ शकते, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. सोमवारी मी कलेक्टरांकडे जाणार आहे, तो हिबानामाच मी देतो तुम्हाला मग त्यांनी सांगावे हा मी नाहीच म्हणून. त्यामध्ये त्यांचे आधार कार्ड सुद्धा असतील.

भुमरेंनी पाठवलेल्या नोटीसवर बोलताना अंबादास दानवे म्हणाले की, मी ती नोटीस वाचली देखील नाही, थेट वकिलांकडे पाठवली आहे. उलट त्यांनी मोठा दावा दाखल करावा, म्हणजे कोर्टात पैसे भरताना ते पैसे कुठून आले हे तरी उघड होईल. माझ्याकडे या प्रकरणाचे 'खमंग मटेरियल' असून मी कोर्टात त्याची वाट पाहत आहे.

या प्रकरणात पोलिसांनी भुमरेंच्या ड्रायव्हरला पाठीशी घातल्याचा आरोप दानवेंनी केला. तसेच, वकील संदीप गव्हाणे हे लुटमारीचे धंदे करतात आणि बापू भुमरे त्यांच्याकडेच बसलेले असतात, असा दावाही त्यांनी केला. भुमरेंचा जो चालक सध्या चर्चेत आहे त्याच्या भावावर कुठेतरी ३७६ चा गुन्हा दाखल झाला आहे. त्या गुन्ह्यात मेरे पास १००-२०० कोटी है अब मेरा कोई कुछ नही कर सकता असे असल्याचे माझ्या कानावर आले आहे. FIR मी काढतो आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, मी जो आरोप केला तो केवळ भुमरेंचा ड्रायव्हर आहे इतका माझा आरोप आहे. माझ्या आरोपाचे केवळ त्यांनी उत्तर द्यावे. त्यांचा ड्रायव्हर आहे हे त्यांनी कबुल केले आहे. त्यांचा जन्म १९८५ शीचा आहे मग हिबानामा १९७१ होतो कसा हा माझा प्रश्न होता. दुसरा प्रश्न हिंदू कुटुंब मुस्लीमाला हिबानामा कसे करुण देते? याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. गट नंबरचा जा विषय आहे मी त्यांच्यात म्हटलंय की आधीचा गट नंबर १७४ आणि आताचा सर्वे नंबर ८९ असे माझ्या पत्रात स्पष्ट आहे. ते दुसरेच काही तरी बोलत आहेत. तिथे तो गट नंबर नाही हे मला माहिती आहे. तुमचा तालुका तिकडे आहे पण माझं या परिसरात रोज जाणे येणं आहे. मला सर्व माहिती आहे. दिशाभूल करणे अतिशय चुकीचे आहे. नोटीसीला मी उत्तर देणार पण हे काही कोर्टात जाणार नाही. भुमरेंनी आधीही काही केले नाही. त्यांच्या मुलाला मारले नाही पडले? किती वाजता पडले? कसे पडले? कुठे ॲडमिट केले? MLC झाली का? पूर्ण माहिती घेतली का? पोलिस तिथे गेले होते का? हे सर्व माहिती घेतली पाहिजे. त्यांना काय झाले मला सर्व माहिती आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, अजित पवारांच्या अपघाताबद्दल चौकशी व्हावी ही सर्व महाराष्ट्राची मागणी आहे.ती लवकरात लवकर व्हावी आणि सत्य समोर यावे ही आमची इच्छा आहे. तर खारगे समितीचा अहवाल येत असेल आणि त्यामध्ये पार्थ पवार जर नसेल तर त्या अहवालाला काहीही अर्थ नाही. असे अहवाल शेवटच्या टप्प्यात होत असतात. राज्यसभेच्या जागेसाठी महाविकास आघाडीची चर्चा सुरू असून होळीनंतर चित्र स्पष्ट होईल, असेही त्यांनी नमूद केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ मार्च २०२६


## जिद्द व सकारात्मक विचार हेच जीवनाच्या यशाचे रहस्य-अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव



**उमरगा :** प्रतिनिधी 'राष्ट्रीय सेवा योजनेतून नीती मूल्यांचे संस्कार घडून युवकांमध्ये श्रम मूल्याची रुजवन होते. व्यक्तीमध्ये जिद्द व सकारात्मक विचार असेल तर विपरीत परिस्थितीतही नेत्रदीपक यश मिळवता येते.' असे प्रतिपादन लातूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्री देविदास जाधव यांनी केले. ते मौजे व्हांताळ येथे उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरातील दिनांक 27 फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी गावचे सरपंच श्री माधव जाधव यांनी श्रमदानाचे महत्त्व सांगून गाव विकासात युवकांचे योगदान याविषयी भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले हे होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी शिबिरार्थी स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक करून येणाऱ्या काळात व्हांतळ हे गाव इतर खेड्यासाठी आदर्शाचा मार्गदर्शक ठरेल असे सांगितले. या प्रसंगी व्यासपीठावर तंटामुक्त समितीचे अध्यक्ष महेश पाटील, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री प्रभाकर पाटील, महाविद्यालयाचे उपप्राचार्य विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, डॉ डी व्ही माने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ भरत शेळके डॉ अनिल देशमुख प्रा मुरलीधर जाधव डॉ प्रेम चव्हाण, डॉ चंद्रसेन करे, महाविद्यालयाचे कर्मचारी, शिबिरार्थी स्वयंसेवक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ अनिल देशमुख यांनी केले यात त्यांनी सात दिवसात शिबिरार्थी स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचा आढावा सांगून सर्वांच्या सहकार्याप्रती कृतज्ञेची भावना व्यक्त केली. निरंजन कटके व ऋषी चिंचोले या शिबिरार्थी स्वयंसेवकांनी याप्रसंगी आपल्या मनोगतात आपले अनुभव कथन करून शिबिरात झालेल्या व्यक्तिमत्त्व विकासाचे फायदे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्रेम चव्हाण यांनी केले तर आभार डॉ भरत शेळके यांनी मानले.

## कालिकादेवी विद्यालयाचे 'एन एम एम एस' परीक्षेत नेत्रदीपक यश

**शिरूर कासार :** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने महाराष्ट्र राज्य शिक्षा परिषद, पुणे.यांच्या वतीने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना अर्थात 'एन एम एम एस' शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती.या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेमध्ये शिरूर (का.) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने, नेत्रदीपक यश संपादन केले असून विद्यालयाचे एकूण 'सात विद्यार्थी' या आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी या शिष्यवृत्तीचा हातभार लागणार आहे. विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली,व त्यांनी सुरू केलेल्या 'श्री कालिकादेवी पॅटर्नच्या' परीक्षेमुळेच विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळाले आहे.शासनाकडून आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी मिळणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती पुढील शिक्षणासाठी हातभार लावणार आहे.आणि विद्यार्थ्यांना नवी प्रेरणाही देणार आहे.असे भावोद्गगार प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी या निकालाच्या संदर्भात काढले आहेत. शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले विद्यार्थी १) कु. पद्मजा हनुमंत विघ्ने २) कु. श्रावणी ब्रह्मदेव नेटके ३) कु. श्रावणी विजयकुमार शिंदे ४) चि. ध्रुव सचिन मंगरूळकर ५) चि. विराज सुभाष यमपुरे ६) चि. अक्षय अनिरुद्ध बडे,७) कु. स्वराली लक्ष्मीकांत भांडेकर या सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्यामुळे माजी मंत्री तथा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,लोकनेते मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब, मा. रोहित (दादा) क्षीरसागर साहेब. प्रशासन अधिकारी डॉ. राजूजी मचाले साहेब, सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेशजी पवार साहेब, कार्यवाहक एम.ए.राऊत सर, प्राचार्य केशव भांगे साहेब, विद्यालयातील पर्यवेक्षक, उपप्राचार्य, सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रश्नांतून शोधाकडे आणि शोधांतून ज्ञानाकडे; इकरा पब्लिक शाळेत विज्ञानाचा चैतन्यदायी उत्सव!



**जळगाव :** भारताचे थोर शास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते डॉ. सी.व्ही.रमन यांनी लावलेल्या 'रमन इफेक्ट' या जागतिक संशोधनाच्या स्मरणार्थ, मोहाडी येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'राष्ट्रीय विज्ञान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन उपशिक्षक इश्तियाक अहमद यांनी केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना 'रमन इफेक्ट' म्हणजे काय आणि प्रकाश विखुरण्याच्या प्रक्रियेमागील विज्ञान अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि शाळेचे मुख्याध्यापक शेख शकील यांनी आपल्या भाषणात डॉ. सी.व्ही.रमन यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला. "विज्ञानाचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी व्हावा आणि विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारण्याची सवय लावून घ्यावी."असे आवाहन त्यांनी यावेळी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख उपशिक्षक आरिफ खान यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित विविध भित्तिपत्रके आणि प्रतिकृती तयार करून आपल्या कल्पकतेचे सादरीकरण केले.

## राखेत फिनिक्स

रात्री झोपताना! सकाळचा धाक!
मणक्यात वाक! पडलेला!!

काय ही जिंदगी! जीवघेणा खेळ!
नाही कुठे मेळ! लागलेला!!

सूर्याच्या सोबत! दिवसाची धाव!
जगण्याचा भाव! वाढलेला!!

डोईवर जरी! वेदनेचे ढग!
काळजात धग! पेटलेली!!

स्वप्नांच्या ओझ्याचा! खांद्यावर भार!
वाटेत अंधार! पडलेला !!

जरी राख झाली! उभ्या आयुष्याची!
राखेत फिनिक्स! जन्मलेला!!



ज्ञानेश्वर गायके,
कन्नड


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

एम.जे. युट्युब चॅनल


## जेईएस मध्ये मोफत इ.१२ वी ऑनलाईन टेस्ट सिरीज वर्गाची सुरुवात

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जिल्ह्यातील गरीब, होतकरू व अभ्यासू विद्यार्थ्यांसाठीजे ई एस महाविद्यालय जालना येथे MHT~CET परीक्षेसाठी मोफत ऑनलाईन टेस्ट सिरीजची सुरुवात दि.२मार्च पासून होत असून इच्छुक विद्यार्थ्यांनी श्री एम जी सोनी यांच्याशी भ्रमणध्वनी क्र.९४२२७१२६४१ यावर संपर्क साधावा. तसेच यावर्षी इयत्ता अकरावी विज्ञान शाखेच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत विशेष इयत्ता बारावी (विज्ञान) वर्गाचे आयोजन दि. ४मार्च २०२६ पासून सुरू होणार आहेत. याबाबतच्या अधिकच्या माहितीसाठी उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना यांच्याशी संपर्क साधावा, असे आव्हान प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ मार्च २०२६


## वाङ्मय मंडळाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा




**उमरगा :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे वाङ्मय मंडळाच्या वतीने 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. प्रमुख उपस्थितीत विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे व कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एन. मुच्छटे यांनी प्रास्ताविकातून मराठी भाषेचे साहित्यिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले.पहिल्या सत्रातील अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले यांनी विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी, सर्जनशील लेखन व संशोधनात्मक वृत्ती विकसित करावी, असे आवाहन केले. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून विचारांची आणि संस्कारांची भाषा असल्याचे त्यांनी नमूद केले.दुसऱ्या सत्रात डॉ. एस. पी. इंगळे व डॉ. डी. बी. ढोबळे यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या 'फिल्ड व रिसर्च प्रोजेक्ट' विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. पी. परसकल्ले यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एस. टी. तोडकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तोपखाना केन्द्रीय विद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा




**नाशिक (प्रतिनिधी) :** शहरातील तोपखाना केंद्र येथील पीएमश्री केन्द्रीय विद्यालय क्रमांक १ मध्ये शनिवारी सकाळी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. महान भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सर सी.व्ही. रमन यांनी 'रमन इफेक्ट' चा शोध लावल्याबद्दल हा दिवस साजरा केला जातो. विद्यालयाचे प्राचार्य गजराज मीना यांनी डॉ. सी.व्ही. रमन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. आपल्या प्रेरणादायी संबोधनात प्राचार्य मीना यांनी संशोधन आणि नवोपक्रमाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे आणि प्रत्येक घटनेमागील तर्क समजून घेणे आवश्यक आहे. यावेळी विज्ञान विभागाचा सक्रिय सहभाग होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विज्ञान शिक्षिका उज्ज्वला चांदोरकर,

अनुक्षमा सरदेसाई, धरित्री निर्भवणे, मंगला गायकवाड, कल्पना शिंदे, अमित कुमार शुक्ला, सतीश बडगुजर, शैलेंद्र कुमार यादव आणि रोहित गौड यांच्यासह शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## प्रतिभा निकेतन विद्यालय मुरूम येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** या प्रयोगशाळेचे उद्घघाटन व सी व्ही रामन यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य उल्हास घुरघुरेसर व श्री शाळू सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उप मुख्याध्यापक कोंढारे सर पर्यवेक्षक परसाळगे सर श्री श्री महामुनी सर श्री राठोड सर,श्री शिवशरण तांबडे सर श्री चंद्रशेखर कोराळे सर, श्री संतोष बिंदगे सर, श्री चव्हाण सर श्री स्वामी सर, श्री प्रशांत मुरूमकर सर, कु.अनिशा फुगटे मॅडम कु.आरती कोराळे मॅडम, सौ.सपाटे मॅडम, सर्व विज्ञान शिक्षक उपस्थित होते.28 फेब्रुवारी हा भारतात दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. 1928 मध्ये सर सी.व्ही. रमण यांनी 'रामन इफेक्ट' या महत्त्वपूर्ण शोधाची घोषणा केली होती ज्यासाठी त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला. या दिवशी देशभरात वैज्ञानिक जागृती आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. याचाच एक भाग म्हणून प्रतिभा निकेतन विद्यालय मुरूमच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीनी वेगवेगळे विज्ञान प्रयोग सादर केले. यामध्ये सहावीच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. श्रेया बालाजी भोसले,समीक्षा संजय शेळके,आस्था अशोक गोडबोले, अर्निया विजयकुमार शेळके, अरशिया पटेल ,बुशरा शेख, मीरा मुळे,धनश्री राठोड, संस्कृती टेकाळे,सुकृती मुदकन्ना, शुभ्रा मुदकन्ना, समृद्धी खुणे, मेघना कटारे, काव्या फिरंगे, तन्वी चव्हाण, श्रावणी वाकळे, समीक्षा शेळके,श्रद्धा येवले,धनश्री राठोड, साक्षी मुदकन्ना, अनन्या महिंद्रकर, रोहन धुमाळ,अथर्व कोरे,शशिकांत भोसले,सम्यक सुतके,महेश चिलोबा,प्रणव वाघ, श्लोक झुरळे,सोमनाथ सुरवसे,मयंक मिणीयार,प्रशांत शेंडगे, रितेश

दुर्गे,अब्दुल मकानदार, आरुष भोसगे,युवराज वाकळे, गणेश खुणे,कपिल हिरेमठ,प्रथमेश जिडगे या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कु. अनिशा फुगटे मॅडम श्रीमती स्वामी मॅडम,कोराळे मॅडम यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कु,आस्था अशोक गोडबोले यांनी केले आभार श्रेया बालाजी भोसले यांनी मानले.

## चिकलठाणा मनपा शाळेचा क्रीडाडंका; खो-खो विजेतेपद, ऋषिकेश स्पर्धेत उपविजेते









**छत्रपती संभाजीनगर :** स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल या मनपा प्रशासक तथा आयुक्त आदरणीय जी.श्रीकांत सर यांच्या संकल्पनेतून आयोजित गारखेडा विभागीय क्रीडा संकुल मनपा क्रीडा महोत्सवात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात मनपा चिकलठाणा शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले. कबड्डी ,खो-खो रस्सीखेच ,रनिंग, गोळा फेक विविध खेळात मुलं सहभागी झाली. मनपा चिकलठाणा शाळेच्या विद्यार्थ्यांनी खो-खो स्पर्धेत (मुले) विजेता पद मिळवत प्रथम पारितोषिक (ट्रॉफी) मिळवले.तर रस्सीखेच स्पर्धेत (मुली) उपविजेता ट्रॉफी मिळवत जल्लोष साजरा केला.

या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री पी.पी. शिंदे सर उपस्थित होते.श्रीमती. भारद्वाज मॅडम, शिंदे मॅडम, श्री. पठाण सर, इरफान सर यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ मार्च २०२६


## आला होळीचा सण

आला होळीचा सण
नवा संदेश घेवून
नवीन संकल्प करावयास
आतुरले किती मन

आला होळीचा सण
ज्ञानाची ज्योत घेवून
अज्ञानाची करूया होळी
पुरणपोळी खाऊन

आला होळीचा सण
सद्गुणांचा मंत्र घेवून
दुर्गुणांची करूया होळी
बंधुभाव पाळून

आला होळीचा सण
एकतेची शिकवण घेवून
जातीधर्माची करूया होळी
मानवता धर्म पाळून

आला होळीचा सण
सुख शांती घेवून
क्रोधाची करूया होळी
दया, करुणा अंगीकारून

आला होळीचा सण
मैत्रीचा ठेवा घेवून
वैराची करूया होळी
हेची होळीची शिकवण



-रविंद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि. यवतमाळ
मो.नं.9011559106

## महाराष्ट्राची शान मराठी

गीतेचे तत्वज्ञान सांगते
ज्ञानेश्वरीतून ओवी मराठी
ओवीओवीतून तत्वज्ञान उकलते
जागृती करण्यास भाषा मराठी

संत तुकोबांच्या अभंग गाथेतून
जगण्याचे मर्म सांगते मराठी
टाळ विणेचा झंकार गुंजतो
ओठावरती अभंग माय मराठी

काना मात्रा अनुस्वार वेलांटीने
शोभून दिसते भाषा मराठी
प्रत्येकाच्या ओठावर खेळते
अलगद प्रेमळ माय मराठी

माय मराठीचा लळा लागता
प्रत्येक जण बोलतो मराठी
एका शब्दातून अनेक अर्थ
उकलून देते माझी माय मराठी

वारी मधल्या अभंगात गुंजतो
ज्ञानोबा तुकोबा जयघोष मराठी
टाळ , वीणा , चिपळ्या बोलती
जय जय जय जय जय मराठी

आक्रमणांना पुरून उरली
पचवूनी साऱ्या भाषा मराठी
कथा , कविता , कादंबरीतून
खळखळ वाहते माय मराठी

आनंदाने स्वीकार करुनी
परभाषेतील शब्द मराठी
अरबी उर्दू तमिळ कानडी
बोलू लागले गोड मराठी

मराठी भाषा रसाळ मधाळ
आनंदाने बोला माय मराठी
बोलता बोलता बोलून जातो
परभाषिक ही भाषा मराठी

भाषा बोलता लळा लाविते
पुन्हा पुन्हा बोलण्यास मराठी
प्रत्येकाच्या मनावर कोरली
माय मराठी मायबोली मराठी



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

# समाजशास्त्र विभागाची मुक्तीसोपान न्यास वृद्धाश्रमास शैक्षणिक भेट




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय येथील समाजशास्त्र विभागातर्फे मुक्तीसोपान न्यास वृद्धाश्रम येथे शैक्षणिक भेट देण्यात आली.या वेळी वृद्धाश्रमाच्या संचालिका सौ. मालती करंदीकर, व्यवस्थापक श्री. संदीप सानप व सहाय्यक श्री. अमोल सोन्जे यांनी विद्यार्थिनींना वृद्धांची ओळख करून दिली. सध्या या वृद्धाश्रमात एकूण ४५ ज्येष्ठ नागरिक वास्तव्यास असून, त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व सोयी-सुविधांची सविस्तर माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली. विद्यार्थिनींनी वृद्धांशी मनमोकळा संवाद साधत आपल्या विविध कलागुणांचे सादरीकरण केले. तसेच ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यमय जीवन लाभावे यासाठी योग प्रशिक्षण देऊन आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ नागरिकांनीही त्यांच्या आवडत्या काव्य व संगीताच्या माध्यमातून विद्यार्थिनींसोबत हितगुज करत आनंददायी वातावरण निर्माण केले. आधुनिक काळात प्रत्येक व्यक्ती कार्यरत असल्याने वृद्धावस्थेत योग्य जीवन जगण्यासाठी अशा वृद्धाश्रमांची आवश्यकता वाढत असल्याचे मत काही ज्येष्ठांनी व्यक्त केले. वृद्धाश्रमात सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थिनींनी आनंदमय वातावरण निर्माण करून ज्येष्ठांशी संवाद साधल्याबद्दल व्यवस्थापक श्री. संदीप सानप व सहाय्यक श्री. अमोल सोन्जे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत प्राध्यापकांचे अभिनंदन केले. समाजशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. आरती धनवे यांनी महाविद्यालय व विभागाच्यावतीने आभार व्यक्त केले. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे सांगत विभागाचे कौतुक केले.या शैक्षणिक भेटीत सर्व विद्यार्थिनींचे उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदविला.

# महानगरपालिका शाळेत विज्ञान दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्रा.व मा शाळा चिकलठाणा येथे डॉ. सी. व्हीं.रमण यांचे स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री.पी.पी. शिंदे सर यांनी डॉ. सी. व्हि. रमण यांचे प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. श्रीमती भारद्वाज मॅडम यांनी मुलांना विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले.या निमित्ताने मुलांनी छोटे छोटे प्रयोग सादर केले. यामुळे मुलांची विज्ञान जिज्ञासा जागृत झाली. श्रीमती भींगोले मॅडम यांनी सुरेख फलक लेखन केले या कार्यक्रमासाठी श्री. राठोड सर, सूर्यवंशी सर, पठाण सर श्रीमती. शिंदे मॅडम, फुलंब्री कर मॅडम उपस्थित होत्या.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ मार्च २०२६


## एसटी प्रवाशांसाठी मोठी बातमी! सवलत हवी असल्यास 'हे' स्मार्ट कार्ड आजच काढा, अन्यथा बसेल मोठा फटका!




**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (MSRTC) एसटी प्रवाशांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि मोठा बदल जाहीर केला आहे. आपल्या सर्वांच्या लाडक्या 'लालपरी' मध्ये प्रवास करणाऱ्यांसाठी ही खरोखरच एक 'डिजिटल क्रांती' आहे. यापुढे, जर तुम्हाला एसटी बसमधील विविध सवलतींचा लाभ घ्यायचा असेल, तर नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये ही घोषणा केली होती, आणि आता त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. सरकारी अनुदान गरजू व्यक्तींपर्यंत योग्य प्रकारे पोहोचावे, कागदपत्रांचा गोंधळ कमी व्हावा आणि एक पारदर्शक 'Cashless' तिकीट व्यवस्था असावी, हा यामागील मुख्य उद्देश आहे.NCMC कार्ड म्हणजे काय आणि ते कोणासाठी आवश्यक आहे ?हे NCMC कार्ड म्हणजे एक प्रकारचं स्मार्ट कार्ड आहे, जे तुम्हाला एसटी बसमध्ये तिकीट काढण्यासाठी आणि तुमच्या सवलतींचा फायदा घेण्यासाठी वापरावं लागेल. यामुळे प्रवासाची प्रक्रिया खूप सोपी आणि जलद होईल. हे कार्ड मुख्यतः एसटीच्या विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांसाठी आवश्यक आहे. यामध्ये खालील प्रमुख गटांचा समावेश आहे* विद्यार्थी (Student Concession)* ज्येष्ठ नागरिक (Senior Citizens)* महिला (ज्यांना सध्या ५०% सवलत मिळते)* दिव्यांग व्यक्ती* स्वातंत्र्यसैनिक* मान्यताप्राप्त पत्रकार* आणि इतर सरकारी सवलत योजनांचे लाभार्थी.स्पष्टपणे सांगायचं झाल्यास, जर तुमच्याकडे हे NCMC कार्ड नसेल, तर तुम्हाला यापुढे एसटी बसमध्ये कोणतीही सवलत मिळणार नाही. त्यामुळे ज्यांना सवलतीचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी हे कार्ड लवकरात लवकर काढून घेणे गरजेचे आहे.NCMC कार्ड कसं मिळवायचं आणि त्यासाठी कोणती कागदपत्रं लागतील ?हे कार्ड मिळवण्याची प्रक्रिया सध्या सोपी केली जात आहे. राज्यभरात ३,००० हून अधिक एजंट्स नेमण्यात आले आहेत, जे ग्रामीण भागातील प्रवाशांसाठीही खूप सोयीस्कर ठरतील. नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, लवकरच अधिकृत केंद्रे आणि ऑनलाइन पर्याय देखील उपलब्ध होऊ शकतात. कार्ड काढण्यासाठी तुम्हाला काही आवश्यक कागदपत्रे लागतील. यात मुख्यतः वय, ओळखपत्र आणि तुम्ही कोणत्या सवलतीसाठी पात्र आहात, ते दाखवणारे प्रमाणपत्र (उदा. आधार कार्ड, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, विद्यार्थी ओळखपत्र, दिव्यांगत्व प्रमाणपत्र इत्यादी) यांचा समावेश आहे. हे कार्ड 'कॉन्टॅक्टलेस' असल्यामुळे, तुम्हाला बसच्या इलेक्ट्रॉनिक तिकीट मशीनवर (ETM) फक्त टॅप करून तिकीट काढता येईल, ज्यामुळे वेळ वाचेल आणि गोंधळ कमी होईल.NCMC कार्डची किंमत आणि त्याचे फायदे काय आहेत ?नवीन NCMC कार्डची किंमत १९९ रुपये (GST सहित) आहे. जर तुमच्याकडे आधीचे जुने स्मार्ट कार्ड असेल, तर ते एक्सचेंज करून तुम्हाला १४९ रुपयांत हे नवीन कार्ड मिळू शकते. एकदा कार्ड घेतल्यानंतर, ते रिचार्ज करून तुम्हाला प्रवास करता येईल, ज्यामुळे प्रवास अधिक सोपा आणि पारदर्शक होईल.या NCMC कार्डचे अनेक फायदे आहेतसर्वात महत्त्वाचा म्हणजे 'Cashless' आणि 'डिजिटल' तिकीट व्यवस्था. यामुळे सुट्या पैशांचा प्रश्न मिटेल.सरकारी अनुदानाचा गैरवापर थांबवता येईल आणि योग्य व्यक्तींनाच त्याचा लाभ मिळेल.प्रवासाचा अचूक रेकॉर्ड ठेवता येईल, ज्यामुळे प्रशासनाला चांगल्या सेवा देण्यासाठी मदत होईल.जलद गतीने तिकीट काढता येईल, त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल.एकाच कार्डने महाराष्ट्रातील कोणत्याही एसटी बसमध्ये सवलतीचा लाभ घेता येईल.एक महत्त्वाचा संदेश !काही प्रवाशांकडून या कार्डच्या किमतीवर आणि अनिवार्यतेवर टीका होत असली तरी, सरकारने हे पाऊल 'डिजिटल इंडिया'च्या दिशेने एक महत्त्वाचे असल्याचे म्हटले आहे. याचा उद्देश केवळ प्रवासाला अधिक सुकर आणि पारदर्शक बनवणे हा आहे. त्यामुळे, मित्रांनो, जर तुम्हाला एसटीच्या सवलतींचा फायदा घ्यायचा असेल, तर कोणताही विलंब न करता लवकरात लवकर आपले NCMC कार्ड काढून घ्या. अधिक अपडेट्ससाठी MSRTC च्या अधिकृत वेबसाइटला किंवा तुमच्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधा. ही खरोखरच आपल्या दैनंदिन प्रवासात एक मोठी क्रांती ठरणार आहे !

## देवगिरी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी अँण्ड मैनेजमेंट स्टडीज मध्ये रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त डी.आय. टी. एम एस महाविद्यालय व श्री सत्य साई ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी डीआयटी एमएस महाविद्यालयमध्ये थॅलेसेमिया ग्रस्त बालकासाठी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी रक्तदान शिबिराचे उद्घाटन म.शि.प्र मंडळ समन्वयक प्रा सबिहा शेख मॅडम यांच्या हस्ते झाले, यावेळी संचालक डॉ विवेक महाले, उपसंचालक डॉ रामेश्वर गायकवाड, रक्तदान केंद्र प्रमुख महेंद्रसिंग चोहान, डॉ अरुण वाकडीकर, डॉ विजय कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. या रक्तदान शिबिरास विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. ९७ विद्यार्थ्यांनी या शिबिरामध्ये रक्तदान केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभागप्रमुख प्रा. डॉ. शेखर कोठुळे, रा.से.यो कार्यक्रमाधिकारी प्रा. विकास मिश्रा, प्रा. प्रतीक जयस्वाल, विभागप्रमुख प्रा. राजेंद्र मोतीगे, प्रा. पल्लवी डाखोरे, प्रा. अभिजित घोडके, IQAC प्रमुख डॉ. पल्लवी भालेराव, सर्व प्राध्यापक व कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# रोटरी क्लब मुरूम तर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी शिक्षकांचा सन्मान



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब मुरूम यांच्या वतीने मुरूम शहरातील मराठी विषयाच्या शिक्षकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि अध्यापन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करून भाषेप्रती आदर व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमात प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरूमचे प्राचार्य उल्हास घुरघुरे, प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. सतीश रामपुरे, प्रतिभा निकेतन विद्यालयाचे कांबळे सर तसेच कला व वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा. प्रसाद इंगोले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब मुरूमचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून क्लबचे सचिव कल्लप्पा पाटील उपस्थित होते.प्रास्ताविक करताना सुनील राठोड यांनी रोटरी क्लब ही सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था असल्याचे सांगितले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी शिक्षकांचा सन्मान व्हावा, त्यांच्या कार्याचे कौतुक व्हावे आणि त्यांनी मराठी भाषेवर केलेल्या प्रेमाची दखल घेतली जावी, या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सत्काराला उत्तर देताना प्रा. सतीश रामपुरे यांनी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यामागील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून संस्कृती, परंपरा आणि अस्मितेची ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर प्राचार्य उल्हास घुरघुरे यांनीही मराठी भाषेच्या जतनासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्नशील राहण्याची गरज व्यक्त केली.अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी "मराठी शिक्षकांचा सत्कार म्हणजे प्रत्यक्षात मराठी भाषेचाच सत्कार होय," असे प्रतिपादन केले. शिक्षकांच्या कार्यामुळेच भाषेची परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, असेही ते म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव कल्लप्पा पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भूषण पातळे, सुनील राठोड, मल्लिकार्जुन बदोले, कलया स्वामी आणि प्रकाश रोडगे यांनी परिश्रम घेतले.मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमामुळे शिक्षकांचा उत्साह द्विगुणित झाला असून उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ मार्च २०२६

## विद्यार्थी मोबाईलच्या मायाजाळात गुरफटला आहे - कवी अय्युब पठाण



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी हे मोबाईलच्या मायाजाळात सापडलेले असून त्यांच्याकडून अवांतर पुस्तके वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे वाचनाचे महत्व दिवसेंदिवस कमी होत आहे. आजकाल चांगली पुस्तके आणि सज्जन माणसे लवकर भेटत नाही. अशी खंत कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी व्यक्त केली. मराठी राजभाषा दिनानिमित्ताने साजापूरच्या जिल्हा परिषद शाळेत आयोजित कार्यक्रमात कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले. त्यांनी सांगितले की, चांगली पुस्तके आणि सज्जन माणसे आपल्याला मिळाली तर नक्कीच वाचकांच्या वर्तनातील सकारात्मक परिवर्तन झाल्याशिवाय राहत नाही. प्रारंभी अय्युब पठाण यांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला आभिवादन करून आपल्या मधूर आवाजात माझी मायमराठी ही कविता सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. या प्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होती. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## स. भु. प्रशालेत मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा





**छत्रपती संभाजीनगर :** येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेच्या पूर्व माध्यमिक विभागात मराठी भाषा गौरव दिन, कविता दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त वरद भागवतकर या इ. पाचवीच्या विद्यार्थ्याने तयार केलेल्या कुसुमाग्रजांच्या चित्राचे अनावरण करण्यात आले. मराठी भाषा विषय शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, वि. दा. सावरकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, बहिणाबाई चौधरी, साने गुरुजी आदी मराठी साहित्यिकांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांचे स्वागत डॉ. विनोद सिनकर यांनी 'किशोर मासिक-मराठी भाषा विशेषांक' आणि गुलाबपुष्प देऊन केले. मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांनी साहित्यिकांच्या वेशभूषेतील श्रीपाद वैद्य, सर्वेश देशमुख, रोहित पहिनकर, सायली ढगे, हर्षवर्धन गाडे, रिद्धी सोळुंके, अध्वर्यु खोबरे, प्रणित बावस्कर या विद्यार्थ्यांचे आणि वेगळ्या पद्धतीने हा कार्यक्रम साजरा करणाऱ्या इ. पाचवी ई च्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक आणि अभिनंदन केले. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक अनिल देशमुख आणि पर्यवेक्षक विजय चापाईतकर, प्रशालेतील सर्व मराठी विषय शिक्षकही होते. सर्वप्रथम कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. इ. 5वी ई च्या विद्यार्थ्यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मराठी विषय शिक्षक डॉ. विनोद सिनकर यांनी प्रास्ताविकातून राजभाषा दिनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना मराठी भाषेची व्याप्ती, थोरवी सांगितली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची गोडी वाढावी अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन इ.5 वी (ई) विद्यार्थ्यांनी केले. कु. सौजन्या पवार, कार्तिक सुपेकर, गायत्री कुकलारे, राशी वैद्य, जय कासलीवाल विद्यार्थ्यांनी मराठी दिन आणि कुसुमाग्रजांविषयी भाषणे केली. रिषी त्रिवेदी आणि गीतमंचच्या विद्यार्थ्यांनी 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...' हे गीत सादर केले. इ. पाचवीच्या पाठ्यपुस्तकातील 'रंग जादूचे पेटीमधले', 'कापणी', आणि 'माहेर' या कवितांवर आधारित अतिशय सुंदर, बहारदार नृत्ये पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध भित्तीपत्रकांचे आणि हस्तलिखिताचे विमोचन या प्रसंगी उपस्थित मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. उपमुख्याध्यापक अनिल देशमुख यांनी मार्गदर्शनानंतर पाठ्यपुस्तकातील एक कविताही सादर केली. कु. सुखदा पाठक आणि तन्वी कुलकर्णी या विद्यार्थिनींनी सूत्रसंचालन केले आणि कु. मैथिली मुळे हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छाया महाजन, अंजली कोलते, डॉ. विनोद सिनकर, रिषी त्रिवेदी, दीपाली सोळुंके, किशोर पाटील, रतन बोऱ्हाडे, स्नेहा सोन्नेकर आणि मुग्धा शास्त्री, तनिषा सूर्यवंशी, पृथा भालेराव, मोहिनी खानझोडे या विद्यार्थिनींसह अनेकांनी परिश्रम घेतले. प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर सहकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## कथा - मास्तर

तोंडाच्या डाव्या बाजूचा व्हट आणि दात दोघांच्या मध्ये तंबाखूला दाबित व्हटाच्या उजव्या कोपऱ्यातून मास्तरनी पिचकारी मारली.डोळ्यावर लावलेल्या चाळीशीच्या मधोमध हाताच्या बोटाने वर सारत माझ्याकडं बघत मास्तर मला बोलला.काय बाई!.. या लेकराला घालायाचं का शाळेत? मी होय म्हटलं.आदरानं गुरुजींनी माझ्या लेकराच्या बोटाला धरून गोड बोलत शाळेत न्हेलं.मलाबी या मध्ये म्हणीत शाळेत बोलवलं.तेवढेच हलकसं मलाबी बर वाटलं.गुरुजी टेबलवरली वही हातात घेत खुर्चीवर बसलं.उजव्या हातात पेन घेतली.आन मला ईचारलं.काय नाव तुमचं?जना पारधीन.कुठं राहताव? पिढीवर.बरं ह्या पोराचं नाव काय?गण्या पारधी.पुन्हा गुरुजीनी इचारलं.अहोss.गण्या पारधी ठीक आहे.या पोराच्या वडिलांचे नाव काय.आणि तुमचं आडनाव काय? पवारीन. रामा. गुरुजींनी अंदाज करून समजून घेतलं.आणि पुन्हा गुरुजी म्हणाले.गणेश रामा पवार असच ना? व्हय.... लिव्हा काय बाय.ते बरूबर हाय. गुरुजींनी दातात आणि व्हटात अडकवलेली तंबाखू डाव्या बोटाने काढली आणि खिडकीतून बाहेर टाकून दिली.पुन्हा गुरुजी खुर्चीवर बसले.समजून सांगण्याच्या स्वरात बोलले.बाई लेकराला रोज शाळेत पाठवा.त्याला खाऊ मिळतो.कपडे मिळतात.पाटी दप्तर मिळतय.सगळी सरकारनं सोय करून ठेवलीय.वाढलेल्या झिंज्या डोक्यावर फाटलेला लुगड्याचा तडप काळा कभिन्न पण तजेलदार चेहरा वर करत बाईनं दबक्या आवाजात गुर्जींना इचारलं.गुरुजी ते इंग्रजी काय असतय वं? ते तुला कोणी सांगितलं? नाही!!!! ते चांगलं असतं मन. ते आपल्या शाळेत हाय न्हवं? होय होय.हाय सेमी म्हणत्यात त्याला.सिमी की बिमी हे आमाला काय समजायचय गुरुजी! लेकरू चांगलं शिकल असच बघा.आन आवर्जून ती मास्तरला बोलती झाली.गुरुजी!! माझं लिकरू दुसऱ्याच्या बिस्किटाची,गोळीची,पेनाची अन भाकरीची सुद्धा चुरी करल तेच्याकडं लक्ष ठेवा. त्याला भरपूर काय शिकवलं नाही तरी चालेल फक्त माणूसपण शिकवा आणि माणसं ओळखायला शिकवा.कारण आमच्या समाजाची लुबाडनुक लै व्हत्याय.चोरी कोण करून जाईल माहित नाही. पण आमच्यावर पोलीस खोट्या केस करतात मारतात सडवतात. गावातले पुढारी लोक दारू उदारीवर पेत्यात.पैसा मागायला गेलं की मारहाण करत्यात.तरण्या ताट्या पुरीच्या अंगाला हात लावत्यात. सरकारच्या योजनेचं तर सांगायलाच नको कोण शेळी देतो म्हणतय.कोण मईस देतो म्हणतय.कोण घर बांधून देतो म्हणतय.आम्हालाबी रहावत नाही. सरकार काय तरी दिईल ह्या आसेवर आमीबी होय म्हणताव.जोबी किडूक मिडूक जमविलेला असतय त्यो त्यांच्या हावाली देऊनं टाकताव.सरकारची योजना काय पिढीपर्यंत येत नाही. वादळ सुटावं आणि ते पिढीवर घोंगावत यावं.त्या वादळामध्ये पालापाचोळा भरा भरा करत वरती जावा तशा योजना आमच्या पिढीवरती सातत्याने फिरत असतात. खाली एक बी येत नाही. तशाच वाऱ्यावर ईरुन जातात... म्हणून ते जे इजणं हाय त्याला पेटवणारं मन माझ्या पोरात तयार करा.उजळणी बाराखडी शिकवत शिकवत जगण्याचं गणितबी शिकवायला ईसरू नका.त्याला चोरी करू नको म्हणावं.चूरी केल्यावर देव खोडी करत असतो तसबी सांगा.चांगल्यासाठी गुरुजी तुमी खोटं बोला.जमल्यास शाळेच्या पटांगणात एक झाड लावायलाबी शिकवा.तहानल्याची तहान आणि भूक लागलेल्या माणसाचं मनं वंळकायला शिकवा.तेवढं जरी माझं पोरगं शिकलं तरी आम्ही पावलो असच आम्ही समजू.लुटा-लूट, खून मारामाऱ्या हें पाप असतय म्हणावं ते देवाला पावत नाही म्हणा.आन गुरुजी त्याला कोणचाच रंग शिकऊ नका.आता सगळेचं रंग भ्रष्ट झालेत.जेवढे रंग पवित्र होते ते रंग त्याचे रूप सगळेच मलिन झालेत. कारण शिकवणारेच आता भ्रष्ट झालेत.त्याबद्दल माझ्या लेकराला कधीच शिकवू नका. त्याला धर्म शिकऊ नका. त्याला त्याग शिकवू नका.त्याला देश प्रेम सुद्धा शकऊ नका. फक्त भाकरीसाठी इमान राकून राबायचं कसं असतं एवढेच शिकवा. त्याला आईपण बाईपण बहीणपण भावंडं आणि समाजातली नातीगोती शिकवायला मातर कधीच ईसरू नका. बाई बोलत होती. गुरुजी निस्त त्या बाईकडे टक लावून बघत व्हतं.मास्तर विचार करीत राहिलं. हातातली पेन थरथरत खाली पडली या बाईत एवढी समज आली कुठून?समज येण्यासाठी त्या बाईनं कोणते अनुभव घेतले असतील?ती आपल्या लेकरात काय पाहत असेल? काय अनुभवत असेल? अनेक प्रश्नांनी मास्तरला घेराव घातला.बाई मात्र मास्तरला नमस्कार करून झपाझपा पावलं टाकत पिढीच्या दिसेनं निघून गेली.....

**लेखक भूमिपुत्र वाघ**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002